दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : १३२ ● पुणे ● गुरुवार, दि. ०३ एप्रिल २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

कामातून दिसणारे माणसाचे मोठेपण अधिक शोभून दिसते 3

समान पाणीपुरवठा व कात्रज-कोंढवा रस्त्याचे... 4

ठळक बातम्या

महापालिकेच्या उत्पन्नात वाढ

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महापालिकेला २०२४-२५ या आर्थिक वर्षात ८ हजार २७२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळविण्यात यश आले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा १२ कोटी रुपयांनी उत्पन्न वाढले असून, आतापर्यंतच्या महापालिकेच्या इतिहासामध्ये मिळालेले हे सर्वाधिक उत्पन्न असल्याचा दावा महापालिकेकडून केला जात आहे. महापालिका आयुक्तांनी २०२४-२५ वर्षासाठी महापालिकेचे ११ हजार ६०१ कोटींचे अंदाजपत्रक तयार केले होते. त्यापैकी ३१ मार्च अखेरपर्यंत ८ हजार २७२ कोटी रुपयांचा महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला. यामध्ये बांधकाम विभागाला बांधकाम परवानगीतून २ हजार ६०१ कोटी, मिळकतकरातून २ हजार ३६५ कोटी, जीएसटीमधून २ हजार ५०० कोटी, मीटरने पाणीपट्टीमधून ११६ कोटी, मुद्रांक शुल्कातून १९० कोटी, तर शासकीय अनुदान आणि इतर मधून ५०० कोटी असे ८ हजार २७२ कोटींचे उत्पन्न मिळाले. गेल्या वर्षी २०२३-२४ या आर्थिक वर्षात पुणे महापालिकेला ८ हजार २६० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. यंदा यामध्ये १२ कोटी रुपयांची वाढ झाली.

विशेष मोहिमेत १२१ शस्त्रे जप्त

पिंपरी (आरंभ पर्व) : पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अवैध शस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारांना पकडण्यासाठी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा एकदा विशेष मोहीम राबवण्यात आली. २० फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२५ दरम्यान राबविलेल्या या मोहिमेत १२१ शस्त्रे जप्त करण्यात आली. त्यामध्ये ३३ पिस्तूल आणि ३४ काडतूस यासह अन्य घातक शस्त्रांचा समावेश आहे. या विशेष मोहिमेत एकूण १२१ गुन्हे दाखल करण्यात आले. यात ३३ पिस्तूल, ३४ काडतूस, ७६ कोयते, सात तलवारी, दोन सुरे, दोन सत्तूर आणि एक पालघन अशा विविध प्रकारच्या घातक शस्त्रांचा समावेश आहे. पिंपरी, भोसरी, सांगवी, वाकड, हिंजवडी, चिखली, चाकण आदी ठिकाणच्या पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रात कारवाई करण्यात आल्या. स्थानिक पोलीस ठाण्यांसोबतच गुन्हे शाखेचे सर्व विभाग, मालमत्ता गुन्हे विरोधी पथक, गुंडा विरोधी पथक आणि अन्य तपास पथकांनी एकत्रितपणे समन्वय साधत ही कारवाई केली.

अपहृत मुलाची दोन तासांत सुटका

पिंपरी (आरंभ पर्व) : पिंपरी-चिंचवड शहरात रोजगारासाठी आलेल्या बुलडाणा येथील दाम्पत्याच्या मुलाचे अपहरण झाल्याची तक्रार दाखल होताच खंडणीविरोधी पथकाने दोन तासांत त्याची सुटका केली. त्यांच्याच गावातील ओळखीच्या व्यक्तीने मुलाचे अपहरण केले होते. मात्र, मुलाचे अपहरण नेमके कोणत्या कारणासाठी झाले, हे अद्याप निष्पन्न झालेले नाही. हा प्रकार चिंचवड येथे घडला. गजानन सुपडा पानपाटील (वय २५, रा. पुनई, जि. बुलडाणा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. मुलाच्या आईने चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

अवघ्या तीन तासात पोलिसांनी केली खुनाच्या गुन्ह्याची उकल

सचिन सुंबे

सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस उप निरीक्षक अनिल जाधव, उदय काळभोर, सर्जेराव बोबडे, रत्नदिप बिराजदार, दिगंबर सोनटक्के, पुजा माळी, संभाजी देवीकर, विलास शिंदे, रामहरी वणवे, नागलोत, रामदास मेमाणे, रवी आहेर, बाजीराव विर, चक्रधर शिरगीरे, राहुल कर्डीले, प्रदीप गाडे, सुरज कुंभार, सचिन सोनवणे, विशाल बनकर, शिवाजी दरेकर, अजिंक्य जोजारे, संदीप धुमाळ, महिला पोलीस ज्योती नवले, उषा थोरात यांच्या पथकाने केली आहे.

लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)

लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील रायवाडी रस्त्यावरील वडाळे वस्ती येथे रवींद्र काशिनाथ काळभोर (वय ४५) या शेतकऱ्याचा खुन झाल्याची घटना मंगळवार (दिनांक १ एप्रिल) रोजी सकाळी उघडीस आली. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू करून अनैतिक संबंधास अडसर ठरत असल्याने पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीचा खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली. या गुन्ह्याची उकल करून लोणी काळभोर पोलिसांनी अवघ्या तीन तासाच्याआत दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

शोभा रविंद्र काळभोर (वय ४२) गोरख त्र्यंबक काळभोर (वय ४१ रा. लोणी काळभोर, ता. हवेली) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी रवींद्र यांचे भाऊ भाऊसाहेब काशिनाथ काळभोर (वय-४८, रा. कदमवाकवस्ती, ता. हवेली) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रवींद्र व शोभा काळभोर हे नात्याने पतीपत्नी आहेत. त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये आहेत. रवींद्र हे शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित होते. रवींद्र यांना मद्याचे व्यसनही होते. दरम्यान, मंगळवारी (ता.१) सकाळी रवींद्र काळभोर हे घराच्या बाहेरील पलंगावर रक्ताच्या थारोळ्यात जखमी व बेशुध्द अवस्थेत आढळून आले.

या घटनेची माहिती मिळताच, लोणी काळभोर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी रवींद्र काळभोर यांना लोणी काळभोर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी रवींद्र यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. रवींद्र काळभोर यांचा कोणीतरी खुन केला असावा. असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज होता.

लोणी काळभोर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविली. व तपासाला सुरवात केली असता, शोभा काळभोर यांचे गोरख काळभोर यांच्याशी अनैतीक संबंध असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने दोन्ही संशयित आरोपींना ताब्यात घेतले. दोघांनाही ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, अनैतीक संबंधात अडसर होत असल्याने रवींद्र काळभोर यांचा कायमचा काटा काढायचा आरोपींनी कट रचला होता.

त्यानुसार सोमवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमरास रवींद्र काळभोर हे पलंगावर झोपलेले असताना, दोन्ही आरोपींनी संगनमत करून त्याच्या डोक्यात फावड्याने वार करून खून केला. अशी कबुली दोन्ही आरोपींनी पोलिसांना दिली आहे. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाणेस बी. एन. एस. क. १०३, ३(५) महा. पोलीस कायदा कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

या गुन्हयाचा प्रकार हा अतिशय गुंतागुंतीचा व क्लिष्ठ स्वरुपाचा असताना देखील अवघ्या ३ तासांचे आतमध्ये आरोपी निष्पन्न करुन, लोणी काळभोर पोलीसांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

डेटिंग ॲपद्वारे जादा पैशांचे आमिष दाखवून तरुणाची फसवणूक

पुणे (दै. आरंभ पर्व)

डेटिंग ॲपद्वारे जादा पैशांचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी तरुणाची २५ लाखांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. हा प्रकार सप्टेंबर २०२३ ते एक एप्रिल २०२५ या कालावधीत घडला. याबाबत एका तरुणाने (वय-३३, रा. कुबेरा पार्क, कोंढवा) फिर्याद दिली आहे. त्यावरून कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर चोरट्यांनी या तरुणाशी आठ सप्टेंबर २०२३ रोजी मोबाईलवर संपर्क साधला. त्याला डेटिंग

ॲपच्या मदतीने जादा पैसा कमाविण्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करण्यास सांगितले. या आमिषाला बळी पडून तरुणाने वेळोवेळी सायबर चोरट्यांच्या बँक खात्यात २५ लाख रुपये जमा केले. परंतु फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर या तरुणाने कोंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

मेट्रोकडे पाठ! पाच लाख प्रवासी घटले, उत्पन्नही झाले कमी

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे मेट्रो प्रवाशांची संख्या मागील तीन महिन्यांपासून घटत चालली आहे. मार्च महिन्यात प्रवाशांच्या संख्येत मोठी घसरण झाली आहे. याचा परिणाम तिकीट उत्पन्नावरही झाला आहे. जानेवारीच्या तुलनेत मार्च महिन्यात सर्वात जास्त पाच लाख प्रवाशी घटले आहेत. पुणे मेट्रोचा पहिला टप्पा पूर्ण होऊन संपूर्ण 33 किलोमीटर मार्गावर मेट्रोसेवा सुरू झाली असली तरी अपेक्षित वेगाने प्रवासी संख्या वाढताना दिसत नाही. मंडई,स्वारगेट ही स्थानके सुरू झाल्यानंतर दैनंदिन प्रवासी संख्या दोन लाखाच्या पुढे पोहोचणे अपेक्षित असताना अद्यापही सरासरी प्रवासी संख्या

एक लाख 60 हजारांच्या दरम्यानच आहे. प्रवाशांना मेट्रोस्थानकापर्यंत सहज जाता यावे यासाठी पुणे मेट्रोने विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. मेट्रोतून प्रवास करणारे दैनंदिन प्रवासी सरासरी 1लाख 44 हजार करतात, पिंपरी चिंचवड ते स्वारगेट मार्गावरील दैनंदिन सरासरी प्रवासी संख्या 63 हजार इतकी आहे तर वनाज ते रामवाडी मार्गावरील दैनंदिन प्रवास संख्या 82 हजार आहे. डिसेंबर 2024 मध्ये महिन्यात प्रवाशांची संख्या 46 लाख 94 हजार 147 इतकी होती, तर तर 7 कोटी 38 लाख उत्पन्न मिळाले होते. जानेवारी 2025 मध्ये हीच संख्या 49 लाख 64 हजार 224 आणि उत्पन्न 7 कोटी 87 लाख उत्पन्न तर फेब्रुवारी मध्ये 43 लाख 7000 प्रवासी तर 7 कोटी 73 लाख उत्पन्न होते. मार्चमध्ये 44 लाख 81 हजार 613 प्रवासी तर 7 कोटी 1 लाख इतके उत्पन्न मिळाले.

औरंगजेब-उद्धव यांचे मिळते-जुळते कर्म!

भारतात मुघल राज्याची मुहूर्तमेढ बाबराने रोवली. बाबराचा जन्म १४८३ साली फरगाना खोऱ्यातील (आताचे उझबेकिस्तान) अंदिजान येथे झाला. इ. स. १४९४ मध्ये १२ वर्षांचा असताना बाबर गादीवर बसला. राज्याच्या विस्ताराच्या लढाईत १५०१ मध्ये त्यास पराभवाचा सामना करावा लागला. देशातून परागंदा व्हावे लागले. अशा या बाबराने १५२६ ते १५३० या काळात भारतावर राज्य केले. त्याच्याच पिढीतील 'औरंगजेब' हा सहावा मुघल. १६५८ ते १७०७ या काळात तो भारताचा मुघल बादशाह होता. औरंगजेबाचा कालावधी म्हणजे रक्तरंजित, क्रौर्याची परिसीमा, स्वकीयांची हत्या, हिंदुद्वेष व हिंदू धर्म नेस्तनाबूत करण्याची मनोवृत्ती, मंदिरे विध्वंस केली, मूर्ती भंग केल्या, हिंदूंना बाटवले. त्यासाठी लाखो हिंदूंचे शिरच्छेद केले, बायका – पोरी पळवल्या.

शाहजहाँ यांना चार मुले. त्यातील औरंगजेब हा तिसरा आणि तीन मुली असे एकूण सात दाम्पत्य. सिंहासनावर आरूढ होण्यासाठी औरंग्याने स्वतःच्या बापास नजरकैदेत ठेवले. त्याचे खाण्या-पिण्याचे हाल हाल केले. त्यास दिवसातून एक कटोरा पाणी पिण्यास दिले जाई. शाहजहाँ यांनी उन्हाळाच्या गर्मीत अधिक पाण्याची मागणी केली असता औरंग्याने ते अमान्य केले. त्वेषाने शाहजहाँने लिहून ठेवले आहे. 'तू अजिब मुसलमान पैदा हुवा जो अपने जिंदा बाप को पानी के लिए तडपा रहा है. तुझसे भली तो वो कौम (म्हणजेच हिंदू) है जिस कौमपर हम राज कर रहे है, उसे ना हम समज सके ना तुम. यहाँ रहनेवाले जो है वो पितृपक्ष मे अपने मरे हुई बाप – परदादा के मुहमें पानी देते है. उनसे तुमने कुछ अच्छा नही लिया"

'दाराशिकोह' हा शाहजहाँचा ज्येष्ठ पुत्र, त्याचा आवडताही. हाच माझा उत्तराधिकारी असे शाहजहाँने दरबारात जाहीर केले होते. दारा औरंग्याप्रमाणे इस्लाम धर्मवेडा नव्हता. तो हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन याही धर्माचा अभ्यास करून त्या त्या धर्माचे उपासक आपल्या दरबारात बाळगून असायचा. त्याने हिंदू धर्मग्रंथांचे उर्दू-अरबीमध्ये भाषांतर करून प्रसारित केले. यामुळे औरंग्या, दाराला काफिर म्हणत असे.

दुसऱ्या मुलाचे नाव 'शाहशुजा'. तो खूप शूर, विवेकी व दृढनिश्चयी असा त्याचा लौकिक होता. त्यानंतर औरंगजेब व धाकटा 'मुरादबक्ष'. राजतख्तासाठी दारा व औरंग्या यांच्यात तुंबळ लढाई झाली असता दारा पराभूत झाला. त्यास औरंग्याने कैदेत टाकले. या गृहकलहात मुरादबक्ष औरंग्याच्या बाजूने लढला. जख्मी अवस्थेत असताना औरंग्याने त्यास पुढील प्रतिस्पर्धी मानून काही दिवसांनी त्याचा तशा अवस्थेतच काटा काढला. तर दुसरा भाऊ शाहशुजा बंगालच्या युद्धामध्ये औरंग्यानेच सुपारी दिलेल्या मिर्झाराजा जयसिंग यांच्याकडून पराभूत झाला. त्याने तेथून पळ काढला तो ब्रह्मदेश दिशेने (आताचे म्यानमार) त्यानंतर त्याचा थांगपत्ता कधीच लागला नाही. दाराशिकोह हा शाहजहाँप्रमाणेच औरंग्याच्या कैदेत होता. शाहजहाँ यास आपला लाडका पुत्र दारा यास भेटण्याची इच्छा होई. परत परत ही इच्छा त्याने औरंग्यास सांगितली. त्यास औरंग्याने एकदा होकार दिला. पिता भेटण्यास उत्सुक असता एका सजवलेला नजराणा झाकलेल्या स्थितीत पित्यासमोर पेश केला गेला. त्याने तो उघडला असता त्यात दारा शिकोहचे छाटलेले शीर होते. शाहजहाँचा अंतिम समय औरंग्याच्या कैदेतच गेला. त्याचे खाण्या-पिण्याचे हाल होत राहिले. अशातच तो आजारी राहून औरंग्याचा कैदी म्हणूनच मरण पावला. औरंग्या हा निव्वळ नराधम. एप्रिल १६८० छत्रपती शिवाजी महाराजांचा देहवास झाला. औरंग्यास वाटले आता मराठा मुलुख आपणासाठी मोकळे झाले. महाराजांच्या कारकिर्दीत कधीही न उतरलेला पण आपल्या सेनापतींना वारंवार महाराष्ट्राच्या मोहिमेवर पाठविणाऱ्या औरंग्याने सप्टेंबर, १६८१ रोजी स्वयं महाराष्ट्राची मोहीम हाती घेतली.अनपेक्षितपणे त्यास प्रचंड प्रतिकारास सामोरे जावे लागले. येथे त्यास सामोरे जाण्यास छत्रपती संभाजी महाराज सह्याद्री समान उभे ठाकले, त्यास सळो की पळो केले, त्याची झोप उडवली, त्याचे जगणे हराम केले. पण फंदफितुरीने संभाजीराजे त्यांच्या हाती लागले. त्यांचा अतोनात हाल करत अंत केला गेला. तो केवळ त्यांचा शत्रू म्हणून नव्हे, मराठा म्हणून नव्हे तर त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारणे अमान्य केले म्हणून. त्याऐवजी संभाजी महाराजांनी मृत्यू स्वीकारला. कालांतराने संताजी – धनाजी

सारखे शूरवीर उभे राहिले. अशाने औरंग्यास मराठा मुलुख कधीच जिंकता आला नाही. लाजेखातर माघारी दिल्लीही जाता आले नाही आणि याच मराठा मातीत तो गाडला गेला. दुर्दैवाने, औरंगाबाद (आजचे संभाजीनगर) येथील खुलताबाद येथे त्याची कबर आजही अस्तित्वात आहे. वास्तविक अशा या औरंग्याचे नामोनिशाण जगाच्या पाठीवरून नाहीसे होणे हेच उचित! तसे ते आहे म्हणूनच औरंग्याचे भूत महाराष्ट्राच्या बोडक्यावर येऊन बसले. त्याच्या समर्थनार्थ अनेक जण उभे राहिले हे समजण्यासारखे आहे. 'पण औरंगजेबाची कबर महाराष्ट्रात राहू द्या' म्हणत त्याच्या समर्थनार्थ उद्धव ठाकरे सेना रिंगणात उतरली हे अनाकलनीय. उबाठास वाटते ती कबर महाराष्ट्रासाठी गौरवशाली आहे. तशी ती किती गौरवशाली आहे हे महत्त्वाचे नाही, परंतु मुसलमानांसाठी ती आहे एवढे निश्चित. याची प्रचिती निव्वळ कबर नामशेष होणार ह्या अफवेतून नागपूर हिंसाचारातून दिसून आली. भले मग उबाठाद्वारे त्यास कोणतेही विचित्र, विक्षिप्त तर्क – वितर्क दिले गेले तरी.

अक्रांता, क्रूर, नराधम, हिंदूधर्म नेस्तनाबूत करण्याचा चंग बांधणाऱ्या औरंग्याच्या काळात त्यांनी क्रौर्याची परिसीमा गाठली. तसे ते क्रौर्य कालानुरूप होते. कायदे, नियम अस्तित्वात असलेल्या आजच्या सुसंकृत युगातही अशा प्रवृत्ती समाजात वावरत असतात. कालानुरूप केवळ त्याचे स्वरूप बदलले. मी ठाकरे कुटुंबाचा निकटवर्तीय व त्यांच्या प्रत्येक हालचालींवर कटाक्ष ठेवणारा, त्यामुळे आत्मचिंतन करता, औरंग्या – उद्धव यात काही बाबतीत साम्य जाणवले. 'औरंग्याची कबर' या संपूर्ण घडामोडीतील उद्धव ठाकरे यांची भूमिका आश्चर्यचकित करणारी पण औरंग्याप्रती सहानुभूतीपूर्वक भासते. बाळासाहेब ठाकरे यांना तीन दांपत्य, तीनही मुले. बिंदामाधव, जयदेव आणि उद्धव. औरंग्याप्रमाणेच उद्धवही तिसरे दाम्पत्य. ठाकरे कुटुंब राजकीयदृष्ट्या बलाढ्य मानले जाते. त्यांचे वारसदार होण्यास गृहकलह माजलाच. बाळासाहेबांच्या हयातीत बिंदा व जयदेव यांनी आपापले व्यवसाय सुरू केले होते. मात्र उद्धव बाळासाहेबांबरोबर केवळ राजकारणात गुंतून राहिला. याचा अर्थ दोन मोठे भाऊ राजकारणात इच्छुक नव्हते असे नव्हे. बरीच वर्षे राजकारणात राहिल्याने उद्धव यांनी शिवसेनेवर मगरमिठी घेतली होती. त्यांनी पुढील अनर्थांच्या शक्यतेचा विचार करत आपले भविष्यातील स्थान बळकट करण्याच्या उद्देशाने सर्वत्र आपले विश्वासू, खुशमस्करे, भाट, चाटू पेरून ठेवले. बाळासाहेबांच्या उतरत्या व उद्धवजींच्या उगवत्या काळात बाळासाहेबांशी फंदफितुरी, कटकारस्थान, बेईमानी करण्यास सज्ज असणाऱ्यास आपल्या अस्तिनेत पाळले. त्यामुळे निर्णायक वेळी प्रतिकार, उठाव असा झालाच नाही. सत्तेचे हस्तांतरण सहजी साध्य झाले. कुटुंबात यावरून प्रचंड वाद निर्माण झाले. प्रकरण काही वेळा हाताबाहेरही गेले. बाळासाहेबांच्या संपत्तीचीही सामोपचाराने विभागणी झाली नाही. राजसत्तेबरोबरच संपत्तीही एकट्या उद्धवजींनी हडपली. बाळासाहेबांचे मृत्यूपत्रही संशयाच्या भोवऱ्यात अडकले. यास त्यांचे बंधू जयदेव यांनी आव्हान देत कोर्टाची पायरी चढली. संपूर्ण कुटुंबाची वाताहत झाली. निव्वळ स्वतःच्या कुटुंबासह उद्धव औरंगजेब ठरले.

शिवसेनेत बाळासाहेबांचे निर्णय घेण्याचे अधिकारही उद्धवजींनी हिरावून घेतले. त्यांना संपूर्णतः शक्तिहीन करण्यात आले. त्यांना एकाकी पाडण्यात आले. पदाधिकारी, कार्यकर्ते एवढेच नव्हे तर नाते, हितचिंतक व जनतेशी त्यांचे संपर्क संपुष्टात आणले गेले. त्यांच्या खाण्या-पिण्यावरही अंकुश आणले गेले, यावर कुटुंबातूनच प्रश्न उपस्थित केले गेले. थोडक्यात काय तर शाहजहाँप्रमाणेच बाळासाहेबांना आपल्या अंतिम काळात त्यांच्याच निवासस्थानी मातोश्री येथे नजरकैदेत ठेवले गेले. बाळासाहेबांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनणे सहज शक्य होते. पण ठाकरे निवडणूक लढणार नाहीत, सत्तेत जाणार नाहीत तर रिमोटने सत्तेवर नियंत्रण ठेवेल असा त्यांचा दृढनिश्चय होता. शिवसेनेची निश्चित ध्येयधोरणे तसेच हिंदुत्वाशी ते कायम इमानदार राहिले, त्यात कोणतीही तडजोड केली नाही. कोणाचीही फसवणूक केली नाही. कुणाचाही मुलाहिजा राखला नाही. सत्तेसाठी औरंग्याप्रमाणेच उद्धवजींनीही स्वकियांशी गद्दारी केली. शिवसेना संपूर्णतः स्वयंकेंद्रित केली. कर्तृत्ववान, तुल्यबळ व प्रतिस्पर्धी तसेच बाळासाहेबांशी एकनिष्ठ अशांचा अत्यंत निर्दयीपणे – क्रूरपणे काटा काढला. त्यांना नेस्तनाबूत करण्याचे प्रयत्न झाले. बाळासाहेबांनी मांडून दिलेल्या चौकटी पलीकडे जाऊन असंगताशी संगत केली. त्यांच्या विचारसरणीला मूठमाती देत अंतिमतः औरंग्याप्रमाणेच सत्तास्थानी ते आरूढ झाले.

औरंग्याने पित्यासह आपल्या भावांचीही हत्या केली. असे करणे आजच्या युगात शक्य आहे का? बिंदामाधव व जयदेव यांच्या हाती काय लागले? बाळासाहेबांची राजकीय विरासत व संपत्ती एकट्या उद्धवने हडपली. भावांना व नात्यागोत्यांना खाईत लोटले. मातोश्रीतून त्यांना परागंदा केले गेले. त्यांचे नाव तरी आज कुणाच्या कानी पडते का? म्हणजेच काय तर औरंग्याने जसे आपल्या स्वकीयांवर मरण आणले तसे यासमयी यांच्या नशिबी मरण यातना आल्या.इस्लाममध्ये 'कर्मा' यास स्थान नाही. ऐवजी त्यांच्यात 'किफारा' म्हटले जाते. याचा अर्थ तुम्ही जे कराल तेच तुमच्यावर उलटते. औरंगजेबास आपल्या किफाराची इतकी भीती असे की त्यास वाटे जे मी केलं तेच माझ्या नशिबी येणार. औरंगजेब जेव्हा महाराष्ट्राच्या मोहिमेवर आला तत्पूर्वी त्याने आपल्या मुलांना दूरच्या मोहिमेवर धाडले. त्याला भीती होती आपल्या पश्चात आपली मुले दिल्लीतील आपले तख्त बळकावतील आणि माझाही शाहजहाँ होईल. उद्धवही आपल्या तुल्यबळांशी असेच वागतात. त्यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी हेरगिरी करतात. त्यांच्या नाजूक बिंदू हाती राखतात. यातून स्वयं बाळासाहेबही सुटले नाहीत. संपत्तीची लालसा औरंग्याची कमजोर बाजू. त्याने केवळ हिंदूंवर जिझिया कर लादला. त्याचप्रमाणे संपत्तीची लालसा ही उद्धवजींचीही कमजोर बाजू. उमेदवारी, पदे इ. मिळवण्यासाठी इच्छुकांकडून येथे खंडणी घेतली जाते. औरंग्यास टोपी विणण्याचा छंद तर उद्धवजी टोपी घालण्यात माहीर. औरंग्याने मंदिरे लुटली. उद्धवजी महानगरपालिकावर डल्ला मारतात. बाळासाहेब हे हिंदुहृदयसम्राट. त्यांच्यात दुरान्वयेही वरील एकही दुर्गुण नव्हता. पण असे काय घडले की, त्यांचेच पुत्र उद्धव ठाकरे यांच्यात हे औरंग्यासमान दुर्गुण आले? यास एकमेव कारण सत्तालोलुपता. सत्तालोलुपता ज्याच्या अंगवळणी पडली त्याचा वैचारिक ऱ्हास होणे निश्चित, नैतिकता गळून पडणे निश्चित आणि मी जे करतो तेच योग्य असा त्याचा समज होणे निश्चित.

तो त्यास विनाशाकडे नेतो याचेही भान त्यास राहात नाही हेही निश्चित. औरंग्याने जे जे त्याकाळी केले त्याची पुनरावृत्ती उद्धवजींच्या कर्मातून आज दिसून येत आहे. औरंग्या अवतरल्याचा भास होत आहे. या दोघांमध्ये साम्य पाहिल्यास पुनर्जन्मावर विश्वास होऊ लागतो.

कळमोडी धरणातून नदीपात्रात पाणी सोडण्यास सुरूवात

किरण खुडे

राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)

खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील कळमोडी धरणातून बुधवार (दि. २) पासून आरळा नदीपात्रात पाणी सोडण्यास सुरूवात झाली. तीव्र झालेल्या उन्हाळ्यामुळे, पश्चिम भागातील नागरिकांच्या मागणीवरून पिण्यासाठी तसेच चासकमान धरणाच्या पुनर्भरणासाठी धरणातून नदीत पाणी सोडण्यात आल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

या पाण्याचा फायदा आरळा नदीतीरावर असलेल्या नागरिकांना पिण्यासाठी तसेच जनावरांसाठी होणार असल्याची माहिती जलसंपदा प्रशासन विभागाच्या वतीने देण्यात आली.

खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील आरळा नदीवरील कळमोडी गावाजवळ १.५१ टीएमसी क्षमता असलेले हे कळमोडी धरण खेड तालुक्याच्या पश्चिम व पूर्व पट्यातील गावांसह आंबेगाव तालुक्यातील सातगांव पठार भागातील शेतकरी व नागरीकांना उपयोगी ठरणारे आहे.

सद्यस्थितीत या धरणात ९०.९२ टक्के (१.३७ टीएमसी) पाणीसाठा शिल्लक आहे. कळमोडी धरणाखालील कोयाळी, साकुर्डी, कहू , कळमोडी, चिखलगांव यांसह अन्य गावाजवळून वाहणाऱ्या आरळा नदीच्या पात्रात पाणी सोडल्याने शेतकऱ्यांना शेतीला पाण्याबरोबरच पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था होणार आहे. तसेच नदीकिनारी असणाऱ्या पाणीयोजनाही ऐन उन्हाळ्यात या पाण्यामुळे सुरू राहणार आहेत.

कळमोडी धरणातून आरळा नदिपात्रात सुमारे २५० क्युसेक्स वेगाने हे पाणी वरील गावांमधून जाऊन चासकमान धरणाच्या जलाशयात समाविष्ट होणार असल्याने चासकमान धरण्याच्या पाणीसाठ्यातही वाढ होणार आहे. धरणाच्या लाभक्षेत्रातील गावांचा पिण्याच्या पाण्याचा साठा राखीव ठेवून उर्वरीत सर्व पाणी चासकमान धरणात सोडणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

थोडक्यात

श्री साई सेवा ट्रस्टच्यावतीने रामनवमी निमित्त विविध उपक्रमाचे आयोजन

वडगाव (आरंभ पर्व) : पुण्यातील वडगाव बुद्रुक येथील श्रीसाई सेवा ट्रस्टच्या वतीने दरवर्षीप्रमाणे रामनवमीनिमित्त गुढीपाडवा ते रामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. ह्या उत्सवांतर्गत अखंड विना सप्ताह, भजन महोत्सव, रामनवमी दिवशी श्रीराम जन्मोत्सव, भव्य शोभायात्रा आणि महाप्रसाद यांनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते यावर्षी उत्सवाचे हे १५ वे वर्ष आहे. दिनांक सहा एप्रिल रोजी रामनवमीनिमित्त दिवसभर विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.सायंकाळी पाच वाजता पालखी सोहळा व सायंकाळी सात वाजता महाप्रसाद होणार आहे. साई सेवा मंदिर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष नगरसेवक हरिदास चरवड यांच्या पुढाकारातून दरवर्षी हा कार्यक्रम होत असतो. वडगाव बुद्रुक तसेच सिंहगड रोड परिसरातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक मा. नगरसेवक श्री हरिदास चरवड यांनी केले आहे.

नांदेड सिटीमध्ये एच एस आर पी नोंदणी शिबिराचा शुभारंभ

धायरी (आरंभ पर्व) : नांदेड सिटीतील नागरीकांच्या समस्या लक्षात घेऊन नांदेड सिटी रहिवासी संघ व निर्मला घुले पाटील प्रतिष्ठान याच्या अंतर्गत सर्व २०१९ पूर्वीच्या गाड्यांचे एच एस आर पी नंबर प्लेटचे नोंदणी शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. निर्मला घूले प्रतिष्ठान जनसंपर्क कार्यालय नांदेड सिटी मल्टिस्पेशालीटी हॉस्पिटलच्या खाली येथे हे शिबिर चालू करण्यात आले आहे. यामुळे नांदेड ,खडकवासला, कोल्हेवाडी, जेपीनगर, व परिसरातील नागरिकांना याचा लाभ होणार आहे. ह्या मध्ये शासकीय शुल्कामध्ये ही सुविधा मिळत असल्यामुळे नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. ह्या संधीचा लाभ नागरीकांनी घ्यावा असे आवाहन आयोजक श्री. रुपेश घुले पाटील केले आहे.या कार्यक्रमासाठी खडकवासला भाजपा महिला आघाडीच्या अध्यक्ष रश्मी घुले पाटील , श्री हेमेंद्र जोशी ,निळकंठ दादा देडगे, जितेंद्र धुमाळ ,डॉ कृष्णकांत घोटेकार व श्री महेश बजाज व रहिवासी समतीचे सदस्य उपस्थित होते.

पुण्यात तिसऱ्या एचएसबीसी गोल्फ लीगचा शानदार ग्रँड फिनाले

पुणे (दै. आरंभ पर्व)

एचएसबीसी इंडियाने थ्राईव्हच्या सहकार्याने पुण्यातील नामांकित अशा ऑक्सफर्ड गोल्फ कोर्स येथे तिसऱ्या एचएसबीसी गोल्फ लीगचे शानदार आयोजन केले. माजी भारतीय क्रिकेट कर्णधार आणि प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडियाचे विद्यमान अध्यक्ष कपिल देव या दिवसभराच्या कार्यक्रमाला उपस्थित होते. थ्राईव्ह आणि एचएसबीसी इंडियाचे नेतृत्व करणारे अधिकारीही यावेळी उपस्थित होते. तसेच व्यावसायिक गोल्फपटू रिधिमा दिलावरी यांच्यासह अनेक नामवंत मंडळी उपस्थित होती. ग्रेटर नोएडा, बेंगळुरू, हैदराबाद आणि मुंबई येथे सुरुवातीच्या फेऱ्या यशस्वीपणे पार पडल्यानंतर सन्माननीय

प्रादेशिक विजेते एकत्र आले. या मेळाव्याला प्रमुख सीएक्सओ, प्रतिष्ठित नेते आणि उद्योगातील आदरणीय व्यक्तींची उपस्थिती लाभली होती. त्यातून या कार्यक्रमाचे महत्त्वपूर्ण यश अधोरेखित झाले.

संपूर्ण गीत रामायण रामभक्तांसाठी पर्वणी!

ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवार, सदगुरु ग्रुप तर्फे संपूर्ण गीत रामायणाचे आयोजन

पुणे (दै. आरंभ पर्व)

श्री राम नवमीनिमित्त ॲड. श्री. प्रसन्न दादा मित्रपरिवार आणि श्री. सद्गुरु ग्रुप पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक 4, 5 ते 6 एप्रिल दररोज सायं.6 वाजता महाकवी ग. दि. माडगूळकर आणि स्वर गंधर्व सुधीर फडके सभा मंडप सनसिटी सिंहगड रोड पुणे येथे संपूर्ण गीतरामायण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व रामभक्तांसाठी एक सुरेल पर्वणी ह्या निम्मित अनुभवायला मिळणार आहे.

श्री राम नवमी चे औचित्य साधून ॲड प्रसन्नदादा मित्र परिवार, सद्गुरु ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार आहे. माजी

उपमहापौर ॲड.प्रसन्नदादा जगताप, भारतभाऊ जगताप, यशवंत कुलकर्णी यांच्या नियोजनाखालील होणारे ह्या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरजी उपस्थित राहणार आहेत.

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यमंत्री माधुरी ताई मिसाळ, यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी यावेळी उपस्थित राहणार आहेत. ह्याबाबतचे निमंत्रण ॲड .प्रसन्नदादा जगताप यांनी सर्व मान्यवरांना दिले आहे. ॲड .प्रसन्न दादा जगताप मित्रपरिवार तसेच सद्गुरु ग्रुप यांच्या वतीने भव्य गीतरामायणाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे सादरकर्ते गायक श्री. प्रणव कुलकर्णी यांच्यासह अनेक नामवंत गायक गायिका यामध्ये सहभागी होणार आहेत. रामभक्त तसेच नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन माजी उपमहापौर ॲड प्रसन्नदादा जगताप यांनी केले आहे.

९०च्या मनोरंजन क्षेत्राचा पडद्यामागचा चेहरा

मुंबई (दै. आरंभ पर्व)

प्रेक्षकांना अगदी फिल्म पायरसीच्या दुनियेचा अनुभव अगदी जवळून घेता येणार आहे, कारण ॲमेझॉन एमएक्स प्लेयर ही ॲमेझॉनची मोफत स्ट्रीमिंग सेवा जून 2025 मध्ये फर्स्ट कॉपी या आगामी सीरीजचं स्ट्रीमिंग करण्यासाठी सज्ज आहे. ईदच्या निमित्ताने या सीरीजचा टीझर लाँच करत त्यातून 1990 च्या मुंबईची थरारक झलक दाखवण्यात आली. या काळात बॉलिवूडला पायरसीचा मोठा धोका तयार झाला

होता. या सीरीजमध्ये गुलशन ग्रोव्हर, मुनव्वर फारूकी, क्रिस्टल डिसूझा, साकिब अयुब, आशी सिंग, मेयांग चँग, इनाम उल हक आमि रझा मुराद या नामवंत कलाकारांच्या मुख्य भूमिका आहेत. ही सीरीज प्रेक्षकांना एका अनोख्या दुनियेची सफर घडवण्यासाठी सज्ज आहे. 90च्या दशकातल्या फिल्म इंडस्ट्रीची झलक दाखवणाऱ्या या टीझरमध्ये मुनव्वर फारूकी साकारत असलेला, सामान्य कुटुंबातला आरिफ पायरसी जगाचा राजा बनतो. मनोरंजन क्षेत्रातल्या मोठ्या असामी आणि त्यांच्या जवळचे लोक आरिफला रोखण्यासाठी काहीही करायला तयार असतात. तिथूनच आरिफसाठी अस्तित्वाची लढाई सुरू होते. विशेष म्हणजे, पहिल्यांदाच बॉलिवुडचा बॅडमॅन गुलशन ग्रोव्हर प्रसिद्ध अभिनेते रझा मुराद यांच्यासोबत झळकणार आहेत. रझा मुराद या सीरीजमध्ये कॅमिओ करत असून पहिल्यांदाच ओटीटीवर दिसणार आहेत. ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे कंटेट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, 'फर्स्ट कॉपीतून आम्ही ताज्या दमाची, थरारक सीरीज घेऊन येत आहोत, जिच्यात पहिल्यांदाच एका वेगळ्या विश्वाचा धांडोळा घेण्यात आला आहे. ही गोष्ट महत्त्वाकांक्षा, धोका आणि सत्तेच्या अमर्याद आसक्तीची आहे. थरारक पद्धतीने मांडण्यात आलेली यातली गोष्ट, खिळवून ठेवणाऱ्या व्यक्तीरेखा व पार्श्वभूमी 90 च्या दशकातल्या आयुष्याची आठवण करून देणाऱ्या आहेत. ही बोल्ड सीरीज ॲमेझॉन एमएक्स प्लेयरच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवताना आम्हाला आनंद होत आहे.'

आपल्या भूमिकेविषयी मुनव्वर फारूकी म्हणाले,'आरिफची गोष्ट अशा जगाचं प्रतीक आहे, जिथं सहजपणे काहीच मिळत नाही. ही व्यक्तीरेखा साकारताना मला त्याच्या अंतरंगात डोकावता आलं.

कामातून दिसणारे माणसाचे मोठेपण अधिक शोभून दिसते

डॉ. प्रकाश आमटे यांचे मत; डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते आमटे दाम्पत्याला पहिला 'एआयबीडीएफ गोंदण पुरस्कार'

पुणे (दै. आरंभ पर्व)

"निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या लोकांमुळे निसर्गाचा विध्वंस होतो, अशी अंधश्रद्धा आपल्याकडे आहे. त्यावर शहरी लोक परिसंवाद घेतात. मात्र, विकासाच्या नावाखाली आपण निसर्गावर प्रचंड बोजा टाकतो आहोत, हे आपण विसरून जातो आणि निसर्गात राहणाऱ्या लोकांना दोष देतो. मात्र, निसर्गाच्या सानिध्यात राहून, त्याच्याशी एकरूप झालेल्या लोकांमुळे निसर्गाचा समतोल राखला जात आहे," असे मत ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी केले.

● डेक्कन जिमखाना: 'एआयबीडीएफ गोंदण पुरस्कार प्रदान सोहळ्यावेळी डावीकडून डॉ. मंदाकिनी आमटे, डॉ. प्रकाश आमटे, डॉ. माधव गाडगीळ व अशोक सुरतवाला ●

पुण्यातील ऑटो-इम्यून ब्लिस्टरिंग डिसीज फाऊंडेशनच्या (एआयबीडीएफ) वतीने ज्येष्ठ समाजसेवक डॉ. मंदाकिनी व डॉ. प्रकाश आमटे यांना पहिला 'एआयबीडीएफ गोंदण पुरस्कार' डॉ. गाडगीळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. डेक्कन जिमखाना क्लब येथे आयोजित सोहळ्यात निवेदक प्रवीण जोशी यांनी डॉ. आमटे दाम्पत्याची प्रकट मुलाखत घेतली. प्रसंगी माजी भारतीय राजदूत गौतम बंबावाले, 'एआयबीडीएफ'चे संस्थापक विश्वस्त अशोककुमार सुरतवाला, डॉ. शरद मुतालिक, अनिरुद्ध बंबावाले, ॲड. जयंत हेमाडे, त्वचारोगतज्ज्ञ डॉ. सुनील वर्तक, उद्योजक नितीनभाई देसाई, निवृत्त प्रशासकीय अधिकारी रमानाथ झा, यशवंत खैरे, अनुज गांधी, गीतांजली घाटे, सविता गोखले, महेश जानी, विष्णू मनोहर, सुहास एकबोटे, विनय मणियार, जयंत गोखले, ॲड. एस. बी, खुरजेकर, निलेश तोष्णीवाल, भूषण पानसे, डॉ. पार्वती पैरायतूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. माधव गाडगीळ म्हणाले, "वाघांची संख्या वाढली आहे. ते पोटासाठी शिकार शोधत असतात. त्यांना माणसे सापडतात. शहरी लोक म्हणतात, जंगली प्राण्यांचे शहरात अतिक्रम होतेय, पण यांनीच निसर्गाच्या आतमध्ये अतिक्रमण केले आहे, त्याचे काय करायचे हा विचार केला पाहिजे. काही हजार वर्षापूर्वी हत्ती, वाघ जंगलात राहत होते. त्यांच्या रहिवासावर सर्वांनीच अतिक्रमण केले आहे. शहरी व गावखेड्यातील, सुशिक्षित व सुस्थितीतील शहरी माणूस आणि निसर्गात राहणारा माणूस यांच्यातील दरी कमी होईल, तेव्हाच या देशात काहीतरी वेगळे घडेल. अत्याधुनिक तंत्रज्ञानाने जगणे सुलभ होत असले, तरी आर्थिक विषमता अधिकाधिक गडद होत आहे. मोठमोठ्या प्रकल्पामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यावर सर्वांनी एकत्रित विचार करण्याची गरज आहे."

डॉ. प्रकाश आमटे म्हणाले, "त्वचेच्या आजाराचे दुःख इतरांना कळत नाही. कुष्ठरोग्यांशी जवळून संबंध आले. सहा रुग्णापासून सहा हजारपर्यंत रुग्ण झाले. हातापायांना बोटे नसलेल्या माणसांनाही बाबांनी स्वाभिमानाने जगायला शिकवले. सुरुवातीला अनेक अडचणी आल्या. काही लोकांचा विरोध झाला. कुष्ठरोग्यांमुळे आमच्याकडे आलेले पाहुणे पाणीही प्यायला घाबरत. मात्र, बाबांनी हे काम नेटाने पुढे नेले. तेव्हाही काही लोक बाबांच्या बरोबर होते. पु. ल. देशपांडे यांना त्यांचा फार आदर होता. समाज मोठेपण देतो, तेव्हा माणूस मोठा होतो. पण कामातून माणसाचे मोठेपण दिसायला हवे."

"बाबांच्या आणि ताईंच्या कार्यातून प्रेरणा घेत आम्ही हेमलकसाला गेलो. तरुण वयात आव्हानात्मक काम करण्याची संधी मिळाली. स्वयंप्रेरणेने घेतलेल्या या निर्णयात मंदाकिनी सोबत होती. अभावात आनंद मानून तिने खंबीरपणे साथ दिली. हेमलकसामध्ये काम करताना आरोग्य, शिक्षण यावर भर दिला, त्यातूनच त्यांचा विकास होत गेला. स्थानिक भाषेत अनौपचारिक शाळा सुरू केली. आज हेमलकसा कुटुंब हजार लोकांचे आहे. क्रूर प्राण्यांच्या सहवासात राहूनही जिवंत आहे. त्यामुळे त्यांच्यावर माझा विश्वास आहे. त्यांना त्रास दिला नाही, तर ते काही करत नाही. आपल्या गरजा किती वाढवायच्या आणि कुठे थांबायचे हे समजलेच पाहिजे," असे डॉ. प्रकाश आमटे यांनी सांगितले.

डॉ. प्रकाश आमटे पुढे म्हणाले, "सामाजिक संस्थांसोबत शासनाची संवेदनशीलता वाढायला हवी. शहरी माणसामध्ये अंधश्रद्धा जास्त आहेत. आदिवासी भागात जागृती करणे अधिक सोपे आहे. दोन्ही संस्कृतीत वेगळेपण आहे. त्या लोकांच्या मनात आपलेपणाची भावना निर्माण करायला आम्हाला वेळ लागला; पण त्यांनी एकदा स्वीकारल्यावर सर्व गोष्टी जमून आल्या. लोकांची सेवा करताना देवाचा फार विचार करता कामा नये. बाबांनी तरुणांना घडविण्याचे काम केले. सोमनाथ प्रकल्प उभारला. त्यातून श्रमसंस्कार शिबीर सुरु केले. अनेक तरुण त्यातून तयार झाले. प्रत्येकाने एखाद्याची मदत केली, तरी समाजात बदल घडेल. शिक्षणात मोठी विषमता आहे. मूल्यशिक्षण, पर्यावरण यावर काम व्हायला हवे. कोणत्याही अपेक्षेशिवाय काम करत गेलो, त्यामुळे काहीतरी राहिले असे वाटत नाही. कोणतेही काम करताना लाज वाटू देऊ नका. मोबाईलचा वापर मर्यादित ठेवा." डॉ. मंदाकिनी आमटे म्हणाल्या, "लोकांचा फार विचार न करता चांगले आयुष्य जगणे हेच तारुण्य आहे. कुष्ठरोग्यांसाठी काम करणाऱ्या बाबांच्या घरात जाणार म्हणल्यावर माझे आईवडील तयार झाले नव्हते. त्यांना धक्का बसला होता. पण एकदा बाबांना भेटा, आनंदवन पहा, असे सांगितल्यावर ते आले आणि पाहिल्यानंतर लग्नाला होकार दिला. आपण करत असलेल्या कामातून मिळणारा आनंद हेच सुखी आयुष्य आहे. या कामाच्या निमित्ताने आम्हाला खूप सुखाने सहजीवन जगता आले. बाबा साधनाताईंना कधी विरोध करायचे नाहीत. नास्तिक असूनही त्यांनी ताईंना साथ दिली. त्याच भावनेने माझा आणि प्रकाश यांचीही वाटचाल सुरु राहिली. आज आयुष्याच्या पंच्याहत्तरीतही आम्ही समाधानाने आयुष्य जगत आहोत. प्राण्यांनाही माणुसकीच्या नात्यानेच सांभाळले, त्यामुळे तेही आमच्यावर विश्वास टाकून एकत्रित कुटुंबाचा भाग बनले." डॉ. शरद मुतालिक यांनी 'एआयबीडीएफ'च्या कार्याविषयी सविस्तर माहिती दिली. 'त्वचेच्या आजारांबाबत जागृती करून ऑटो-इम्यून ब्लिस्टरिंग आजारांनी ग्रस्त लोकांना मदत करण्याचे काम फाऊंडेशन करत आहे. अशोककुमार सुरतवाला यांच्या प्रेरणेने दिवंगत जयश्री सुरतवाला यांच्या स्मरणार्थ २०२१ पासून हे काम सुरू आहे. सर्वांसाठी आधुनिक औषधोपचार सुलभ व परवडणारे व्हावेत, यासाठी फाऊंडेशन प्रयत्नशील आहे." डॉ. सुनील वर्तक यांनी आजाराविषयी, तसेच आजाराची लक्षणे, कारणे व आधुनिक औषधोपचार याविषयी सांगितले. स्वागत प्रास्ताविकात अशोककुमार सुरतवाला म्हणाले, "या गंभीर आजाराची जागृती वाढावी, फाऊंडेशनचे काम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचून या कामात लोकांचा सहभाग वाढावा, या हेतूने गोंदण पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले. हा पहिला पुरस्कार निस्पृहपणे महारोगी, आदिवासी विकासासाठी आयुष्य वेचलेल्या आमटे दाम्पत्याला देऊन सन्मानित करणे हा फाऊंडेशनचा गौरव आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन यापुढे आणखी जोमाने काम होईल."

रोहिणी गोडबोले यांनी सूत्रसंचालन केले. अनिरुद्ध बंबावाले यांनी आभार मानले. अनन्या जोगळेकर यांच्या सुमधूर आवाजातील प्रार्थनेने सोहळ्याची सुरुवात, तर पसायदानाने सोहळ्याची सांगता झाली.

थोडक्यात

शिव उद्योग प्रबोधिनी तर्फे उद्योजिका महिलांचा सन्मान

पुणे (आरंभ पर्व) : शिव उद्योग प्रबोधिनी यांच्या वतीने उद्योजिका महिलांचा नुकताच सन्मान करण्यात आला. याप्रसंगी शिव उद्योग प्रबोधिनीचे अध्यक्ष ॲड. गणेश सातपुते, उपाध्यक्ष महेश महाले, कार्याध्यक्ष शुभांगी सातपुते, सचिव सुर्यकांत माडे यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली. अथक परिश्रम, चिकाटी आणि वेगवेगळ्या आघाड़्यांवर एकाच वेळी काम करण्याचे कसब असे उद्योजक होण्यासाठी आवश्यक असणारे गुण महिलांमध्ये उपजतच असतात. परंतु महिलांना योग्य वेळी संधी न मिळाल्यामुळे अनेक महिला उद्योग क्षेत्रामध्ये मागे राहतात. महिलांचे उद्योग क्षेत्रातील प्रमाण वाढण्यासाठी महिलांना योग्य वेळी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे, असे मत ॲड. गणेश सातपुते यांनी व्यक्त केले. वंदना खके (मुद्रण व्यवसाय), सोनाली पाटोळे शर्मा (मोबाईल शॉपी), मुग्धा मित्तल (शिक्षक संस्था), नेही सातपुते (ए ७, कस्टमाईज शॉपी), स्मिता धुमाळ (हॉटेल व्यवसाय) या उद्योजक करणाऱ्या महिलांचा जागतिक महिला दिनानिमित्त शाल, श्रीफळ, सन्मानपत्र देवून त्यांचा सन्मान करण्यात आला. तर यशस्वी उद्योजिका महिलांकडून नवीन उद्योजिका महिलांना सन्मान करण्यात आला. याच बरोबर २५० पेक्षा अधिक महिलांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. स्मिता धुमाळ म्हणल्या की घर आणि उद्योग सांभाळताना महिलांची कायम कसरत होत असते. घर सांभाळताना येणाऱ्या अडचणी आणि उद्योग सांभाळताना येणाऱ्या अडचणी या वेगवेगळ्या असतात. या दोन्ही सोडवण्यासाठी कौशल्यांची गरज असते. काही कौशल्ये आत्मसात करता येतात तर काही कौशल्ये उद्योग करताना शिकता येतात. त्यातूनच खचून न जाता महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये उद्योगांसाठी पुढे आले पाहिजे.

करवाढी विरोधात 'शोले स्टाईल' आंदोलन

किरण खुडे

राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)

राजगुरुनगर येथील राजगुरुनगर नगरपरिषदेने लागु केलेली भरमसाठ करवाढ तात्काळ मागे घ्यावी अथवा, करवाढीला स्थगिती मिळावी. यासाठी पंधरा दिवसांपूर्वी आंदोलन करणारे येथील सामाजीक कार्यकर्ते ॲड. दीपक थिगळे यांनी मंगळवारी (दि. १) पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन केले. करवाढ मागे घेण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले होते. तसेच नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचीही भेट घेऊन माहिती दिली होती. दोन्ही मंत्री तसेच उपोषण आंदोलनाला भेट देऊन पाठिंबा व्यक्त करणाऱ्या आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनीही स्थगिती मिळवुन देऊ असे सांगितले होते. त्यानंतर चार दिवस सुरू असलेले ते आंदोलन त्यावेळी मागे घेण्यात आले होते. विधानसभा अधिवेशन काळात किंवा मार्च अखेरीस शासन करवाढीला स्थगिती देईल अशी अपेक्षा थिगळे व सहकाऱ्यांना होती. आश्वासन देऊन निराशा पदरी पडल्याने दीपक थिगळे यांनी पुन्हा आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या अचानक सुरू झालेल्या आंदोलनाची माहिती मिळताच प्रशासकिय अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले.राजगुरुनगर येथील प्रांताधिकारी कार्यालयासमोरच्या नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाकीवर सकाळी आठच्या दरम्यान हे आंदोलन सुरू करण्यात आले. गावात ही बातमी समजल्यावर मोठ्या प्रमाणावर नागरीक याठीकाणी जमा झाले होते. यावेळी पाण्याच्या टाकीवर चढलेल्या थिगळे यांनी प्रशासकीय अधिकारी व पोलीस यांना पुन्हा आपली भूमिका ध्वनीक्षेपकावरुन जाहीरपणे सांगितली. गावातील नागरीक व तरुण कार्यकर्त्यांनी याबाबत नव्याने रुजू झालेले मुख्याधिकारी अंबादास गरकळ, पोलीस निरीक्षक प्रभाकर मोरे यांनी आंदोलनकर्त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

आ. शेखर निकम यांनी केलेल्या पत्रव्यवहाराला कोकण रेल्वेचा हिरवा सिग्नल

चिपळूण (दै. आरंभ पर्व)

आ. शेखर निकम यांनी आपल्या चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघात असलेल्या रेल्वे स्थानकांतील प्रश्न, उपाययोजना आणि जलद गाडयांच्या थांब्याबाबत कोकण रेल्वेकडे पत्रव्यवहार केला होता. आमदार निकम यांच्या पत्रातील मागण्यांची दखल घेत केल्या जाणाऱ्या कार्यवाही व उपाययोजनांचा खुलासा कोकण रेल्वेचे क्षेत्रीय रेल्वे प्रबंधक शैलेश बापट यांनी आमदार शेखर निकम यांना पाठवलेल्या पत्रात दिले आहे.

चिपळूण स्थानकावर कोकण रेल्वे मार्गावरून धावणाया एकुण गाड्यांपैकी सुमारे ९ एक्स्प्रेस व १४ सुपरफास्ट गाड्या नियमित, साप्ताहीक व द्वि-साप्ताहीक तत्वावर थांबविल्या जातात. रेल्वे स्टेशन पासुन बाजारपेठ पर्यंतच्या भुयारी मार्गाच्या निर्मितीसाठी तांत्रिक दृष्ट्या शक्यतेबाबत परिक्षण करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. तर संगमेश्वर स्थानकात प्लैटफॉर्म क्रमांक १ वरून प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर जाण्यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी एक ओव्हर ब्रीज उपलब्ध असला तरी अतिरीक्त ओव्हर ब्रीज निर्मितीविषयीचा निर्णय निधीच्या उपलब्धतेनुसार सक्षम अधिकाऱ्यांच्या मार्फत घेतला जाईल. प्लैटफॉर्म क्रमांक १ वर पेव्हर ब्लॉकच्या डागडुजीचे कार्य अभियांत्रीकी विभागातर्फे लवकरच हाती घेतले जाईल. तर प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर नव्याने पेव्हर ब्लॉक बसविण्याविषयीची कार्यवाही निविदा स्तरावर असून ते लवकरात लवकर पुर्ण करण्यात येईल. सावर्डे स्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी आवश्यक असणाऱ्या ओव्हर ब्रीज (एफ़ओबी) साठी अंदाजे २.७ करोड तसेच उच्च स्तरीय प्लेटफार्म च्या निर्मितीसाठी अंदाजे १.२८ करोड एवढा निधी आवश्यक आहे. यासाठी संबधित विभागातर्फे निरीक्षण करून निधीच्या उपलब्धतेनुसार सक्षम अधिकाऱ्यांमार्फत योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे. त्याबरोबर कोणत्याही गाडीला देण्यात येणाऱ्या थांब्याविषयीचा निर्णय रेल्वे मंत्रालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये घेतला जातो. त्यामुळे सध्यस्थितीत सावर्डे स्थानकात तीन गाड्याना थांबे देण्यात आलेले आहेत. तसेच गणपती, होळी किंवा सुट्टीच्या काळात या मार्गावर चालविण्यात येणाऱ्या बहुतांश गाड्यांना येथे थांबे देण्यात येत आहेत. मांडवी, मत्स्यगंधा या गाडयांना थांबा देण्याविषयीची कोकण रेल्वेच्या मुख्यालयात पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले असल्याचे नमुद केले आहे. कडवई रेल्वे स्थानकामध्ये स्थानिक रिक्षा व्यवसायिकांसाठी रिक्षा स्टॅण्डसाठी जागा मंजूर करण्याचे अधिकार उपप्रादेशिक परिवह्यन अधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रात आहेत. त्या संदर्भात सर्वेक्षण करुन आवश्यक जागा उपल्ब्ध करुन देण्यात होईल. या स्थानकावर उच्च स्तरीय प्लॅटफॉर्म बांधण्यासाठी अंदाजे १ कोटी २८ करोड खर्च अपेक्षित आहे. त्याबरोबर गाडयांच्या थांब्याचा निर्णय हा वरीष्ठस्तरावर असल्याचे म्हटले आहे. पूर्वी सुरु असलेली रत्नागिरी दादर रत्नागिरी ही गाडी पुर्ववत दादर स्थानकापर्यंत विस्तार करण्याविषयीचा निर्णय रेल्वे मंत्रालय व मध्य रेल्वे यांच्या मार्फत घेतला जाणार आहे. त्याबरोबर विविध गाड्यांच्या आरक्षण कोट्यामध्ये विस्तार करण्याविषयीचा प्रस्ताव कोकण रेल्वेच्या मुख्यालयात विचारार्थ तसेच पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येणार आहे.

'गीत तुझे स्मरताना शतजन्म शोधताना'

मराठीतील अजरामर गीते व त्यांची निर्मिती प्रक्रिया उलगडणारा अप्रतिम कार्यक्रम

पुणे (दै. आरंभ पर्व)

१९३२ साली मराठी चित्रपट संगीताची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि अवघ्या पन्नास वर्षात या सर्व कलाकारांनी मराठी चित्रपट संगीताला समृद्ध केलं. मराठी रसिकश्रोत्यांच्या मनामनांत घर केलेली आणि आपलीशी वाटणारी ही सर्वच मराठी गाणी अगदी सहजतेने प्रत्येक मराठी मनावर संस्कार करत गेली, याच गीतांचा ठेवा पुन्हा नव्याने रसिकांसमोर सादर करताना आनंद होत असल्याचे 'गीत तुझे स्मरताना शतजन्म शोधताना' या कार्यक्रमाचे दिग्दर्शक व संगीत संयोजक देवेंद्र भोमे म्हणाले.

सॅब इव्हेंट्स व डि व्हर्ब थिएटर्स यांच्या वतीने 'गीत तुझे स्मरताना शतजन्म शोधताना' या कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार ४ एप्रिल २०२५ रोजी केशवबाग, डीपी रोड, कर्वेनगर येथे करण्यात आले आहे.

'डि व्हर्ब एक्स्पीरियन्स' या युट्युब चॅनलवर दिग्गज कलाकारांची गाणी आणि त्याची निर्मिती प्रक्रिया उलगडून सांगणारी दोन भागांची मालिका प्रसिद्ध करण्यात आली होती. या मालिकेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. रसिकांकडून देखील ही मालिका कार्यक्रम स्वरूपात सादर करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत होती. त्यानुसार आम्ही ही संगीत मालिका, कार्यक्रम स्वरूपात घेवून येत आहोत. जेणेकरून पु.ल. देशपांडे, ग.दि.माडगूळकर, वसंत प्रभू, राम कदम, केशवराव भोळे, श्रीनिवास खळे, जगदीश खेबूडकर अशा प्रत्येक गीतकार, संगीतकार यांनी त्या काळात अशा महान कलाकृती कशा निर्माण केल्या असतील, या विषयी अधिक विस्तृत संवाद साधता येवू शकेल, असे देवेंद्र भोमे म्हणाले.

या कार्यक्रमाचे दिग्दर्शन आणि संगीत संयोजनाची जबाबदारी देवेंद्र भोमे यांच्याकडे आहे. निवेदन अभिनेत्री व कवयित्री स्पृहा जोशी व गौतमी देशपांडे करणार आहेत. यामध्ये जयदीप वैद्य, शमिका भिडे, मुक्ता जोशी, आशुतोष मुंगळे, भूषण मराठे, निधी घाटे, इशिता सावळे, नम्रता लिमये, अर्णव जोशी, केदार चिखलकर, केतन पवार, नितीन शिंदे, धवल जोशी हे आपली कला सादर करतील.

रामनवमीच्या पवित्र महिम्याचा अनुभव देण्यासाठी केली हातमिळवणी

पुणे (दै. आरंभ पर्व)

जिओहॉटस्टार भारतातील अधिकाधिक प्रेक्षकांसाठी लाइव्ह स्ट्रीमिंगचा अनुभव उपलब्ध करून देत आहे, ज्यामुळे लाखो लोकांना त्यांच्या आवडत्या कार्यक्रमांशी सहजपणे संलग्न होता येत आहे. कोल्डप्लेचे म्युझिक ऑफ द स्फेअर्स आणि महाशिवरात्री: द डिव्हाइन नाइट लाइव्हस्ट्रीमच्या भरघोस यशानंतर, ज्याने लाखो प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले, आता हा प्लॅटफॉर्म 6 एप्रिल रोजी सकाळी 8 ते दुपारी 1 या वेळेत अयोध्येतून एका खास लाइव्हस्ट्रीमसह रामनवमीचा उत्सव प्रेक्षकांसमोर आणण्यासाठी सज्ज झाला आहे. पद्मविभूषण श्री अमिताभ बच्चन या सेलिब्रेशन्समध्ये रामकथेतील भावपूर्ण गाथा सांगतील. सामुदायिक उत्सवांना तंत्रज्ञानाशी जोडून हे लाइव्हस्ट्रीम जिओहॉटस्टारच्या सांस्कृतिक वारशाला जवळ आणण्याच्या आणि लाखो प्रेक्षकांना संस्मरणीय अनुभव देण्याच्या कटिबद्धतेला दाखवते. या महत्त्वपूर्ण प्रसंगी पद्मविभूषण श्री. अमिताभ बच्चन प्रभू श्रीरामाच्या मूल्यांवरील कालातीत ज्ञान आणि चिंतन सामायिक करतील, आपल्या सांस्कृतिक वारशाचा उत्सव सादर करतील आणि भारतासाठी भविष्यकालीन दृष्टिकोनाला प्रेरणा देतील. या उत्सवात प्रभू श्रीरामाच्या जन्माचा व प्रवासाचा आनंद आणि श्रद्धा व्यक्त केली जाईल, ज्यामध्ये रामायणातील सात कांडांचे चित्रण केले जाईल, जे रामजन्मभूमीवरून थेट प्रक्षेपण करून प्रेक्षकांना त्यांच्या वारशाने आध्यात्मिकरित्या प्रगत करतील. श्री. अमिताभ बच्चन मुलांसोबत परस्परसंवादात्मक सत्र देखील आयोजित करतील, ज्यामध्ये निवडक कथा आणि ओव्या आकर्षक व उमजण्याजोग्या पद्धतीने सादर केल्या जातील. अयोध्या येथे झालेल्या विशेष पूजा, मंदिरांमधील पवित्र विधी, भद्रचलम, पंचवटी, चित्रकूट आणि अयोध्या येथील मन:शांती देणाऱ्या लाइव्ह आरती, भक्तीमय भजन आणि कैलाश खेर व मालिनी अवस्थी यांच्यासह आदरणीय कलाकारांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या सांस्कृतिक सादरीकरणांपर्यंत हे लाइव्हस्ट्रीम भक्ती आणि एकतेची सामूहिक भावना जागृत करेल. या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत जिओहॉटस्टारचे प्रवक्ता म्हणाले, आमच्या लाइव्ह स्ट्रीमिंग क्षमतांनी आम्हाला भारतभरातील प्रेक्षकांना सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण अनुभव देण्यास सक्षम केले आहे.

लाइव्ह स्पोर्ट्स, अहमदाबादमधील कोल्डप्ले - लाइव्ह, नुकतेच महाशिवरात्री: द डिव्हाइन नाइटचे 14 तासांचे लाइव्हस्ट्रीम अशा इव्हेण्ट्सना मिळालेल्या उत्स्फूर्त यशामधून आम्हाला मर्यादांना दूर करण्यास आणि भारतातील प्रेक्षकांना अद्वितीय अनुभव देण्यास प्रेरणा मिळाली आहे. रामनवमी हा आपल्या देशामधील अत्यंत पवित्र सण आहे आणि आम्हाला देशाच्या कानाकोपऱ्यामधील लाखो व्यक्तींपर्यंत या पवित्र सणाचे साजरीकरण पोहोचवण्याबाबत सन्माननीय वाटत आहे.

समान पाणीपुरवठा व कात्रज-कोंढवा रस्त्याचे काम मार्गी लावणार

आमदार योगेशअण्णा टिळेकर यांची माहिती; अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर पत्रकारांशी संवाद

- आमदार योगेशअण्णा टिळेकर यांची माहिती
- अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर पत्रकारांशी संवाद

पुणे (दै. आरंभ पर्व)

"शहराला समान पाणीपुरवठा, कात्रज-कोंढवा रस्त्याचे विस्तारीकरण, बेकायदेशीर बांधकामे आणि प्लॉटिंग, महावितरण कोंढवा कार्यालयाचे विभाजन, उड्डाणपुलास धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यासह स्वतंत्र महानगरपालिकेचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. त्यावर संबंधितांनी सकारात्मकता दर्शवली असून, आठवडाभरात सभापती महोदयांच्या दालनात बैठक लावण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात हे सर्व मुद्दे मार्गी लागतील," अशी माहिती विधानपरिषदेचे आमदार योगेशअण्णा टिळेकर यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी योगेशअण्णा टिळेकर यांनी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधला. प्रसंगी भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रा. सचिन जायभाये, भूषण नाहाटा, बाळासाहेब घुले आदी उपस्थित होते.

योगेशअण्णा टिळेकर म्हणाले, "विधानपरिषद सदस्य म्हणून मला अर्थसंकल्पीय अधिवेशनात ३२ तारांकित प्रश्न, ११ लक्षवेधी, ९ औचित्याचे मुद्दे आणि ७ विशेष उल्लेख करण्याची संधी मिळाली. कामगार विभागाच्या विधेयकावर मत मांडता आले.

पुण्यातील पाण्याचा प्रश्न, बेकायदेशीर व अनधिकृत प्लॉटिंग आणि कोंढव्यात अनधिकृत इमारतीत सुरु असलेली शाळा या लक्षवेधीना मंत्रिमहोदय यांनी उत्तर देऊन यावर तातडीने मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी २८० कोटींचा निधी आला, मात्र, त्याचे काम अद्यापही सुरु झाले नाही, याकडे लक्ष वेधले."

"पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात नागरिकीकरण वाढत असून, त्याचा ताण महापालिका प्रशासनावर पडत आहे. परिणामी मुलभुत सोईसुविधा पुरविण्यामध्ये अडचणी येत आहेत. उपनगरांमधील नागरिक कर भारत असूनही त्यांना विकासकामांचा लाभ मिळत नाही.

ही बाब लक्षात घेऊन स्वतंत्र महानगरपालिका तयार होणे गरजेचे आहे. याबाबत मुख्यमंत्र्यांशी संवाद सुरु आहे. लवकरच यावर निर्णय होईल. शहरात बकालपणा वाढतो आहे. व्यापाऱ्यांकडून, विकसकांकडून बांधकामे सुरु आहेत. ते थांबवण्यासाठी महसूलमंत्र्यांशी चर्चा झाली आहे," असे ते म्हणाले.

योगेशअण्णा टिळेकर म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाशेजारील जागेत कर्करोग रुग्णालय उभारावे आणि त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे किंवा त्याठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारावे, अशी आमची मागणी आहे. ही जागा खासगी विकासकाला देता कामा नये. तसेच संगमेश्वर येथे होत असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाप्रमाणे धर्मवीरगडावरही स्मारक व्हावे, अशी भूमिका मांडली.

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने सभागृहात संविधानावर भाषण करण्याची संधी मिळाली. संत सावता माळी यांच्या अरण (सोलापूर) येथील तीर्थक्षेत्र विकासासाठी १०० कोटी मिळावेत व त्याला 'अ' दर्जा मिळावा, अशी मागणी केली."

पत्रकार परिषदेतील महत्वाचे मुद्दे

- कात्रज-कोंढवा रस्त्याचे काम मार्गी लागणार
- २४ तास व समान पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास नेणार
- निकृष्ट दर्जाच्या औषधांची खरेदी झाली, त्याची चौकशी प्राधिकरणामार्फत करावी
- कोल्हापूर जिल्ह्यातील समाज कल्याणच्या अभ्यासिका इमारतीचे बांधकाम
- मुंबई-पुणे व पुणे-नाशिकला जोडणाऱ्या नवीन चार पदरी रस्त्याचे काम मार्गी लावावे
- अवैध मद्यविक्री, गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस ठाण्यांची वाढती संख्या
- कात्रज उड्डाणपुलाचे काम डिसेम्बरपर्यंत पूर्ण होणार
- अनधिकृत गुंठेवारी, प्लॉटिंगवर निर्बंध आणणार
- कात्रज उड्डाणपुलास धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देणार

'तीन ताल' १२ एप्रिलला पुण्यात होणार

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारताचा लोकप्रिय कॉमेडी पॉडकास्ट 'तीन ताल' येत्या १२ एप्रिल रोजी पुण्यात होणार आहे. दुसऱ्या सीझनचा १०० व्या भागात विनामूल्य सहभागी होण्याची संधी पुणेकरांना आहे. 'तीन ताल'ची सुपरहिट तिकडी ताऊ, सरदार आणि खान चा नॉस्टॅल्जिया, बातम्या आणि सामाजिक मुद्द्यांवर आपल्या हटके शैलीत चर्चा करतात. त्यांच्या या अनोख्या अंदाजामुळेच 'तीन ताल' प्रचंड लोकप्रिय ठरला आहे. पहिल्या सीझनच्या यशानंतर, या शोच्या दुसऱ्या सीझननेही १०० एपिसोड्सचा टप्पा गाठला आहे. या १०० व्या एपिसोडचा लाईव्ह शो पुण्यात होत आहे. यासाठी 'तीन ताल'ची संपूर्ण टीम पुण्यात येत आहे. पुण्यातील महाविद्यालयात होणाऱ्या या शोमध्ये 'तीन ताल' टीमसोबत असंख्य 'तीन तालिये' (श्रोते) देखील सहभागी होणार आहे. तिखट हजरजबाबीपणा, विनोद, किस्से आणि धमाल गप्पा रंगणार आहेत.

या कार्यक्रमात शोचे तीन होस्ट कमलेश किशोर सिंह (ताऊ), कुलदीप मिश्रा (सरदार) आणि आसिफ खान (खान चा) थेट प्रेक्षकांशी संवाद साधणार आहेत.

एस. ओ. आर. टी. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचा समारोप

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारतीय प्रदूषण नियंत्रण संघ अर्थात आयपीसीएद्वारे पुण्यात राबविण्यात आलेल्या एस.ओ.आर.टी. प्रकल्पाच्या (कचऱ्याचा पुर्नवापर आणि प्रक्रिया वर्गीकरण प्रकल्प) दुसऱ्या टप्प्याचा समारोप आणि सत्कार समारंभ संपन्न झाला. हा प्रकल्प घरगुती कचऱ्याचे सामुदायिकरित्या योग्य व्यवस्थापन आणि वर्गीकरण यांना प्रोत्साहन देतो. या उपक्रमाअंतर्गत सेंद्रिय कचऱ्याचे खतामध्ये रूपांतर करून डंपिंग ग्राउंडवरील भार कमी केला जातो. एस.ओ.आर.टी. प्रकल्प हा स्वर्ण लता मदरसन ट्रस्ट (एसएलएमटीटी) च्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमाचा भाग असून आयपीसीएद्वारे तो राबवला जात आहे. गेल्या दोन वर्षांत एस.ओ.आर.टी. प्रकल्प पुण्यातील विविध ठिकाणी यशस्वीपणे अंमलात आणण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत 4,40,104 किलो ओल्या कचऱ्याचे प्रक्रिया करून 49,770 किलो खत तयार करण्यात आले असून त्यामुळे डंपिंग ग्राउंडमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा रोखला गेला आहे. हा प्रकल्प मुख्यतः गृहनिर्माण सोसायट्या आणि संस्थात्मक क्षेत्रांमध्ये 300 हून अधिक एअरबिन कंपोस्टर्सच्या साहाय्याने राबवला गेला. यात ठोस कचऱ्याचे शाश्वत व्यवस्थापन, कचऱ्याचे मूळ स्तरावर वर्गीकरण, उच्च-गुणवत्तेचे खत उत्पादन आणि रहिवासी व इतर भागधारकांमध्ये सकारात्मक बदल घडविण्यावर भर देण्यात आला.

थोडक्यात

पुण्यात १२ एप्रिलला होणार २७ वे विश्वबंधुता साहित्य संमेलन

पुणे (आरंभ पर्व) : विश्वबंधुता साहित्य परिषद, रयत शिक्षण संस्थेचे औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आणि काषाय प्रकाशन या संस्थांच्या वतीने २७ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे. संमेलनाच्या निमित्ताने दिला जाणारा 'विश्वबंधुता दर्पण पुरस्कार' ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे, रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे आणि विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समितीच्या सदस्या डॉ. तेजश्री पारंगे यांना प्रदान करण्यात येणार आहे. तिरंगा महावस्त्र, भारताचे संविधान आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती विश्वबंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली. बंधुताचार्य प्रकाश रोकडे म्हणाले, "ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुभाष वारे यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अश्विनी धोंगडे यांच्या हस्ते सकाळी दहा वाजता नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात होईल. प्रसंगी स्वागताध्यक्ष कृष्णकुमार गोयल, कार्याध्यक्ष डॉ. विजय ताम्हाणे प्राचार्य डॉ. अरुण आंधळे प्रा. चंद्रकांत वानखेडे आणि प्रा. शंकर आथरे यांची उपस्थिती राहील."

मूठभर कॅलिफोर्निया बदामांसह शारीरिक आरोग्याला आतून पोषण द्या

पुणे (दै. आरंभ पर्व)

जागतिक आरोग्य दिन 7 एप्रिल रोजी साजरा केला जातो, जो आठवण करून देतो की उत्तम आरोग्य म्हणून दीर्घकाळापर्यंत जगणे नाही, तर आरोग्यदायी व सर्वोत्तम जीवन जगणे महत्त्वाचे आहे. सर्वात महत्त्वपूर्ण घटक म्हणजे पोषण, कारण संतुलित आहार एकूण आरोग्य उत्तम ठेवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. सोपा, पण गुणकारी मार्ग म्हणजे दैनंदिन आहारामध्ये बदामांसारख्या पोषण-संपन्न फूड्सचा समावेश करणे. भारतातील सर्वात लोकप्रिय बदाम - कॅलिफोर्निया बदाम 15 आवश्यक पौष्टिक घटकांसह प्रोटीन, डाएटरी फायबर, आरोग्यदायी फॅट्स, मॅग्नेशियम, झिंक व व्हिटॅमिन ई यांचे नैसर्गिक स्रोत आहेत. ज्यामुळे कॅलिफोर्निया बदाम आरोग्यदायी जीवनशैलीमध्ये स्मार्ट भर आहेत.

पिढ्यानपिढ्या आपल्या आई व आजींनी बदामांचे महत्त्व सांगितले आहे आणि आता, विज्ञानाने देखील त्यांच्या ज्ञानाला पाठिंबा दिला आहे. प्रकाशित करण्यात आलेल्या 200 हून अधिक संशोधन अभ्यासांमधून बदामांचे आरोग्यदायी फायदे निदर्शनास आले आहेत, जे हृदयाचे आरोग्य, रक्तातील शर्करेच्या पातळ्या व वजन व्यवस्थापन सुधारण्यासाठी ऊर्जा देण्यासोबत रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. बदामांमधील आरोग्यदायी फॅट्स व व्हिटॅमिन ई त्वचा चमकदार ठेवण्यास मदत करतात, तसेच ॲण्टी-एजिंग फायदे देतात. भारतीयांसाठी आयसीएमआर-एनआयएन डाएटरी मार्गदर्शकतत्त्वे संतुलित आहारामध्ये दैनंदिन पौष्टिकतेची भर म्हणून बदामांची शिफारस करतात, जे प्लांट प्रोटीन व आरोग्यदायी स्नॅकचे स्रोत आहेत. डाएटरी मार्गदर्शकतत्त्वे तेलकट स्नॅक्सऐवजी या नट्सचे सेवन करण्याची शिफारस करतात, कारण ते एकूण आरोग्य उत्तम राहण्यासाठी आरोग्यदायी पर्याय आहेत.

जागतिक आरोग्य दिनाबाबत मत व्यक्त करत नवी दिल्लीमधील मॅक्स हेल्थकेअरच्या डाएटेटिक्सच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समाद्दार म्हणाल्या, भारतात डाएटरी सवयींमधील बदल आणि बैठेकाम करण्याच्या जीवनशैलीमुळे लठ्ठपणा, कार्डियोव्हॅस्कुलर आजार व मधुमेहामध्ये वाढ झाली आहे, ज्यामुळे एकूण आरोग्य उत्तम ठेवण्याला प्राधान्य देणे अधिक महत्त्वाचे झाले आहे.

मी माझ्या क्लायण्ट्सना नेहमी सल्ला देते की पोषण उत्तम आरोग्याचा पाया आहे आणि अधिकाधिक भाज्या, फळे व बदामांसारख्या पौष्टिक नट्सचे सेवन करणे यांसारख्या लहान, अर्थपूर्ण सवयी मोठा बदल घडवून आणू शकतात.

बदाम विशेषत: हृदयाचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी लाभदायी आहेत, ते एकूण व एलडीएल कोलेस्ट्रॉल आणि हृदयाचे नुकसान करणारी जळजळ कमी करण्यास मदत करू शकतात, ज्यामुळे बदाम संतुलित आहारामध्ये स्मार्ट भर आहेत.

न्यूट्रिशन व वेलनेस कन्सल्टण्ट शीला कृष्णास्वामी म्हणाल्या, यंदा जागतिक आरोग्य दिनानिमित्त भारतातील लठ्ठपणाच्या वाढत्या समस्येचे निराकरण करणे महत्त्वाचे आहे, जेथे बैठेकाम करण्याची जीवनशैली, अनारोग्यकारक आहार सवयी आणि इतर आवश्यक पौष्टिक घटकांची कमतरता असलेल्या कर्बोदके-संपन्न आहाराचे सेवन यामुळे या समस्येमध्ये अधिक भर होत आहे.

१८ एप्रिल रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'सुशीला-सुजीत'च्या ट्रेलरचे अनावरण

दमदार अभिनय, चटकदार प्रसंग, खिळवून ठेवणारे संवाद यांमुळे "सुशीला-सुजीत"ची उत्कंठा शिगेला

- चित्रपटात स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी, प्रसाद ओक आदी आघाडीचे कलाकार

नागपूर (दै. आरंभ पर्व)

स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक यांच्या भूमिका आणि त्यांचे पहिल्यांदाच एकत्र येणे, यामुळे चर्चेत असलेल्या "सुशीला सुजीत"च्या नव्याने आलेल्या ट्रेलरमुळे प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. या ट्रेलरमधील धमाल प्रसंग प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळवत आहेत. एका शानदार समारंभात मंगळवारी या ट्रेलरचे प्रकाशन झाले. उंची निर्मितीमूल्ये, दमदार अभिनय, खुमासदार प्रसंग आणि खिळवून ठेवणारे संवाद ही "सुशीला-सुजीत"ची वैशिष्ट्ये या ट्रेलरमधून अधोरेखित होतात. चित्रपट १८ एप्रिल रोजी सर्वत्र प्रदर्शित होत आहे.

या ट्रेलर मधून काहीतरी भन्नाट पाहायला मिळणार, हे नक्की. एक आई पोलिसांकडे जाते आणि आपला मुलगा हरवलाय म्हणून तक्रार करते. पोलिस तिला घरात भांडण वगैरे काही झालं होतं का, म्हणून विचारतात. पार्श्वभूमीवर आवाज येतो की, मुलगा हरवलेल्या गोष्टीला तब्बल ३५ तास उलटून गेलेत.

तिकडे स्वप्नील आणि सोनाली कुलकर्णी एका घरात बंद दाराआड अडकल्याचे पाहायला मिळते. त्यांचे मोबाईल बाहेर राहिले आहेत. त्यांचे सुटका करून घेण्याचे नाना प्रकारे प्रयत्न चालू आहेत. लॅच उघडून बाहेर पडायचा, गॅलरीतून काही मार्ग निघतो का पाहायचा प्रयत्न होतो. पण लॅच तुटते, गॅलरीतील कुंडी खाली राहणाऱ्या माणसाच्या डोक्यात पडते, अशा अनेक गमतीजमती समोर येतात. विविध चिंता नायकाला सतावत आहेत. त्यात स्वप्नीलला सोनाली छळते आहे, असे एकापेक्षा एक धमाल क्षण पडद्यावर साकारतात. मध्येच अथर्व सुदामे, नम्रता संभेराव पडद्यावर येतात. दोघेही बंद दाराआड अडकल्यावर किंवा चावी घरात राहिल्यावर काय होते याचे सुतोवाच करतात. एका प्रसंगात अमृता खानविलकर दिसते. अडकलेले स्वप्नील आणि सोनाली इमारतीच्या खाली असलेल्या लोकांना हाक मारण्याचा प्रयत्न करतात, पण उपयोग होत नाही. स्वतःची सुटका करून घेण्याच्या प्रयत्नात हे दोघे शेजाऱ्यांसाठी काही कठीण प्रसंग उभे करतात.

एका प्रसंगात बाबाच्या भूमिकेत प्रसाद ओक अवतरतो. "कुठेही जाऊ नका, लवकर परत या... भविष्य बघाते सांगतायत नखाते" असा बाबांचा संवाद असतो. त्यातून हे काहीतरी वेगळे प्रकरण आहे आणि प्रसाद वेगळ्या भूमिकेत पाहायला मिळणार, हे कळून चुकते.

या सर्व धमाल गोष्टी पडद्यावर सादर होतात आणि रसिकांची चित्रपटाबद्दलची उत्सुकता ताणली जाते. ट्रेलर प्रकाशित झाल्यापासून रसिकांकडून चित्रपट कधी बघायला मिळणार असं झालंय... अशा प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली आहे.

'पंचशील एन्टरटेन्मेंट' आणि 'बिग ब्रेन प्रॉडक्शन्स' ने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाचे वितरण पॅनोरमा स्टुडीओजचे असून चित्रपटाची कथा व दिग्दर्शन प्रसाद ओक यांचे आहे. पटकथा व संवाद अजय कांबळे यांचे आहेत. प्रसाद ओक, मंजिरी ओक, स्वप्नील जोशी, संजय मेमाणे, निलेश राठी हे चित्रपटाचे निर्माते आहेत.

कच्चा लिंबू, हिरकणी, चंद्रमुखी या यशस्वी चित्रपटांच्या दिग्दर्शनानंतर प्रसाद ओक दिग्दर्शन करत असलेला हा नवा चित्रपट आहे.

'सुशीला-सुजीत'च्या नावापासूनच त्याचे वेगळेपण अधोरेखित होते. अनेक गोष्टी या चित्रपटाच्या माध्यमातून पहिल्यांदाच होत आहेत. स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक पहिल्यांदाच एकत्र येत असल्याने रसिकांसाठी हा एक वेगळा अनुभव असणार आहे.

"चित्रपटाचे पोस्टर, प्रसारगीत, टिझर यांना मोठा प्रतिसाद प्रेक्षकांनी दिला होता. आता ट्रेलरच्या माध्यमातून प्रतीक्षा शिगेला पोहोचली आहे आणि तशा प्रतिक्रिया सुद्धा आम्हाला मिळत आहेत," असे उद्गार प्रसाद ओक यांनी काढले.

स्वप्नील जोशी म्हणाला, "हा चित्रपट निखळ करमणुकीची हमी देतो. ट्रेलर पाहिल्यावर हे मनोमन पटल्याशिवाय राहत नाही.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.